नि.फौ.ख.क्र. ३९/२०१९
(नि. १९)

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव– मारुती कृष्णांत सोनटक्के
वय – ३३ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
नेमणूक–पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, हुद्दा– पो.कॉ.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही.व्ही.ठाकूर यांच्यामार्फत सुरु–**

सन २०१८ मध्ये माझी नेमणूक वेंगुर्ला पोलीस ठाणे अंतर्गत शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे होती. दि. ०७/०९/२०१८ रोजी अशी विश्वसनीय माहिती मिळाली की जॉन पेद्रु फर्नांडिस, रा. आजगाव भोम यांच्याकडे बेकायदेशीर सिंगल बॅरेल ठासणीची बंदूक आहे. त्यानंतर मी स्वतः माझ्यासोबत प्रभारी पोलीस अधिकारी श्री. खोतसाो, पो.हे.कॉ.भिसे, पो.ना.वेंगुर्लेकर, चालक पो.हे.कॉ.बर्गे असे आम्ही सर्व शासकीय वाहनाने आजगाव भोम येथे सकाळी ८.०० वाजता पोहोचलो. त्यानंतर, आम्ही व दोन पंच असे सर्व जॉन पेद्रु फर्नांडिस यांच्या घर नं. ४४३ आजगाव भोम येथे गेलो. त्यानंतर, आम्ही जॉन पेद्रु फर्नांडिस यांनी बाळगलेल्या हत्याराबाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी स्वतःच्या घरात लपवून ठेवलेली सिंगल बॅरेल ठासणीची बंदूक आमच्यासमोर हजर केली. सिंगल बॅरेल ठासणीची लाकडी दस्ता असलेली एक बंदूक तिची लांबी सुमारे ४.६ फूट अशी होती. **(साक्षीदाराला बंदुकीचा दस्ता नळीसहीत दाखविण्यात आला. त्याचे सील हे न्यायालयासमोर खुले करण्यात आले. त्याला ट्रिगल व ट्रिगल गार्ड, लोखंडी पट्टी व दोन सिलींग कड्या आहेत. सदर बंदुक ही सिंगल बॅरल ठासणीची बंदुक आहे. बंदुकीची एकूण लांबी ४.६ फूट इतकी आहे. त्या कागदी पुठ्ठयावर कागदी लेबल असून त्यावर रासायनिक प्रयोगशाळेचा क्रमांक बी.एल.–९६२/१८ सी.आर.नं. १०७/२०१८ पोलीस स्टेशन वेंगुर्ला असा मजकूर नमूद आहे. सदर बंदुकीच्या दस्त्याला नळीसहीत आर्टीकल –अ देण्यात येते.)** सदर बंदुकीचा दस्ता नळीसहीत आरोपीकडून जप्त करण्यात आला. हा तोच आहे. त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने स्वतःचे नाव जॉन पेद्रु फर्नांडिस, रा. आजगाव भोम असे सांगितले. पोलीस हेडकॉस्टेबल जी.के.भिसे यांनी सदरचा मुद्देमाल जप्त केला. त्यांनी जप्त बंदुकीचा सविस्तर पंचनामा केला. त्यावर पंचांच्या व त्यांच्या सह्यांचे लेबल लावून बंदुक सिलबंद केली. आरोपीला जप्त बंदुकीचा परवाना आहे का ? असे विचारले असता त्याने त्याच्याकडे बंदुकीचा परवाना नसल्याचे सांगितले. आरोपीला फौ.प्र.सं.कलम ४१अ प्रमाणे नोटीस देण्यात आली. त्यानंतर मी स्वतः आरोपीविरुध्द शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे गुन्ह्याच्या घटनेचा प्राथमिक अहवाल क्र.५१/२०१८ नोंदविला. (साक्षीदाराला गुन्ह्याच्या घटनेचा प्राथमिक अहवाल दाखविण्यात

आला.) तो तोच  आहे. त्यावर माझी व शिरोडा पोलीस दूरक्षेत्र अंमलदार यांची  सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (गुन्ह्याच्या घटनेचा प्राथमिक अहवालास **निशाणी २०** देण्यात येते.) त्यानंतर मी  गुन्ह्याच्या घटनेच्या प्राथमिक अहवालावरुन वेंगुर्ला पोलीस ठाणे येथे आरोपीविरुध्द फिर्याद दिली. (साक्षीदाराला फिर्याद दाखविण्यात आली.) ही तीच आहे. ही फिर्याद मी दिली होती.  त्यावर माझी सही आहे. तसेच, त्यावर पोलीस स्टेशन ऑफीसर पो.हे.कॉ.सावंत यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (फिर्यादीस **निशाणी २१** देण्यात येते.) ज्या व्यक्तीच्या ताब्यातून  सिंगल बॅरेल ठासणीची बंदूक मिळून आली त्या व्यक्तीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. ती व्यक्ती आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास  पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांच्यामार्फत सुरु–**

**०२.** मी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे काही वर्षे काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की एखाद्या दखलपात्र गुन्ह्यातील प्राथमिक अहवाल पोलीस दूरक्षेत्र येथे देत असताना अहवाल देणाऱ्याचा फिर्यादी जबाब शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे नोंदवून घेतला जातो.  हे म्हणणे खरे आहे की जबाब लिहून घेतल्यावरती प्राथमिक अहवालाचा (ऑकरन्स रिपोर्ट) छापील नमुना भरला जातो. हे म्हणणे खरे आहे की पोलीस दूरक्षेत्र येथील प्रभारी अधिकारी हा त्याच्या सोबत प्राथमिक घटना अहवाल घेवून संबंधीत पोलीस स्टेशन येथे जातो व दखलपात्र गुन्हा रजिस्टरमध्ये गुन्हा नोंदविला जातो. मला प्राथमिक अहवाल  (ऑकरन्स रिपोर्ट) व फिर्यादी जबाब या मधील फरक माहिती आहे. माझा शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे  फिर्यादी जबाब लिहून घेतलेला नव्हता. माझ्या म्हणण्यानुसार माझा फिर्यादी जबाब प्राथमिक अहवालावर शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे नोंदविण्यात आला होता. माझ्या म्हणण्यानुसार माझा केवळ एक फिर्यादी जबाब घेण्यात आला.

**०३.** मला सदर केसमधील गोपनीय माहिती व्यक्तीगत मिळाली. मला गोपनीय माहिती मिळाली तेव्ही मी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे होतो. सदरची गोपनीय माहिती मला दि. ०७/०९/२०१८ रोजी सकाळी ७.३० वाजता मिळाली.  गोपनीय माहिती देणाऱ्या व्यक्तीने मला ज्याच्याकडे अवैध बेकायदा हत्यार आहे त्याचे नाव सांगितले होते. सदरची माहिती मला मौखिक पध्दतीने मिळाली. मी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र अंमलदार यांचा सहाय्यक म्हणून काम करीत होतो. त्यावेळी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथील अंमलदार पोलीस हेडकॉन्स्टेबल भिसे होते. मी सदरची गोपनीय माहिती माझ्या वरिष्ठांना सांगितली. हे म्हणणे खरे आहे की प्रत्येक पोलीस दूरक्षेत्र येथे दैनंदिनी असते. मला अशी गोपनीय माहिती मिळाली होती की जॉन पेद्रु फर्नांडिस याने अवैध बेकायदेशीर हत्यार बाळगलेले आहे. मिळालेली गोपनीय माहिती शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथील दैनंदिनीमध्ये नोंदविली होती. गोपनीय माहिती मिळाल्यानंतर गोपनीय माहितीची शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथील दैनंदिनीमध्ये नोंद घेईपर्यंत ७ ते ८ मिनिटे लागली. माझ्या म्हणण्यानुसार सदर गोपनीय माहितीच्या आधारावर आम्ही छापा टाकला. मी व इतर कर्मचारी, अधिकारी छापा

टाकण्यासाठी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथून सकाळी ७.४० वाजता निघालो. वेंगुर्ला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. खोत व वाहन चालक बर्गे हे शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे किती वाजता आले ते मला आठवत नाही. मला गोपनीय माहिती मिळाल्यानंतर की मला गोपनीय माहिती मिळण्यापुर्वी श्री. खोत व वाहन चालक बर्गे हे शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे आले होते किंवा कसे हे मला आता आठवत नाही. वेंगुर्ला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. खोत व वाहन चालक बर्गे शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे आले, त्यांना आम्ही सदरची गोपनीय माहिती सांगितली. त्यानंतर आम्ही सर्वजण घटनास्थळी छाप्याकामी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथून निघालो असे घडले. (साक्षीदाराला खटल्याचा अभिलेख दाखविण्यात आला.) तो त्यांनी वाचला.

**दुपारच्या सत्राची वेळ झाल्याने उलटतपास दुपारच्या सत्रापर्यत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-
(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

दिनांक- १०/०५/२०२३

**<u>दुपारच्या सत्रानंतर उर्वरित उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांच्यामार्फत सुरु-</u>**

**०४.** सदर खटल्यामध्ये साक्ष देण्यापुर्वी अभियोगपक्षाने दाखल केलेले सर्व कागद मी पाहिलेले आहेत. अभियोगपक्षाने सदर खटल्यामध्ये दि. ०७/०९/२०१८ रोजीची वेंगुर्ला पोलीस ठाणे दैनंदिनी हा कागद हजर केला आहे तो मी पाहिला. (साक्षीदाराला दि. ०७/०९/२०१८ रोजीचा वेंगुर्ला पोलीस ठाणे दैनंदिनीचा कागद दाखविण्यात आला.) सदरचा कागद हा दि. ०७/०९/२०१८ रोजीची सकाळी ६.३१ ची वेंगुर्ला पोलीस ठाणे दैनंदिनी आहे. सदर कागदामधील मजकूर मी वाचला. हे म्हणणे खरे आहे की दि. ०७/०९/२०१८ रोजी सकाळी ६.३१ वाजता वेंगुर्ला पोलीस ठाणे यांना गोपनीय माहिती मिळाली की शिरोडा पोलीस दूरक्षेत्राच्या हद्दीत एका इसमाने बेकायदेशीर हत्यार बाळगलेले आहे असे सदर कागदावरुन दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की सदर कागदावरुन असे दिसून येते की सदर गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.खोत व वाहन चालक बर्गे हे वेंगुर्ला पोलीस ठाणे येथून शासकीय वाहनाने शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे रवाना झाले. माझ्या म्हणण्यानुसार सदरचा कागद हा खरा व बरोबर आहे. **(<u>आरोपीचे विधीज्ञ श्री.बी.एन.प्रभू यांनी सदर कागद उलटतपासात साक्षीदाराला दाखविला. सबब, सदर कागदाला ओळखीपुरते निशाणी २२ देण्यात येते. सदर कागदातील मजकूर शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर राहील.</u>)** हे म्हणणे खरे नाही की माझ्या उलटतपासातील

परिच्छेद क्रमांक ३ मधील मजकूर की 'सदरची गोपनीय माहिती मला दि. ०७/०९/२०१८ रोजी सकाळी ७.३० वाजता मिळाली, गोपनीय माहिती देणाऱ्या व्यक्तीने मला ज्या व्यक्तीकडे अवैध बेकायदा हत्यार आहे त्याचे नाव सांगितले होते, सदरची माहिती मला मौखिक पध्दतीने मिळाली, मी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र अंमलदार यांचा सहायक म्हणून काम करीत होतो, त्यावेळी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथील अंमलदार पोलीस हेडकॉन्स्टेबल भिसे होते, मी सदरची गोपनीय माहिती माझ्या वरिष्ठांना सांगितली' हे मी खोटे सांगत आहे.

**०५.** आम्ही पोलीस व पंच शासकीय वाहनाने घटनास्थळी गेलो. सदर केसमधील दोन्ही पंचांना कोणी बोलाविले हे आता मला आठवत नाही. मी पंच उदय विठ्ठल परब यांना वैयक्तीक ओळखतो. मी पंच हनुमंत केदार यांना वैयक्तीक ओळख नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर केसमधील पंच उदय विठ्ठल परब हे धाकोरा गावचे रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे आहे की सदर केसमधील पंच हनुमंत केदार हे भोमवाडी ग्रामपंचायतीमध्ये शिपाई या पदावर काम करतात. हे म्हणणे खरे आहे की पंच हनुमंत केदार हे आजगाव भोमवाडी येथे राहतात. सदर केसमधील पंच हनुमंत केदार हे दि. ०७/०९/२०१८ रोजी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे किती वाजता आले हे आता मला आठवत नाही. दि. ०७/०९/२०१८ रोजी छाप्याच्या ठिकाणी छापा टाकण्यासाठी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र मधून निघण्यापुर्वी पंच हनुमंत केदार हे शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे आले किंवा कसे हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथून निघताना शासकीय वाहनामध्ये सदर केसमधील दोन्ही पंच होते. माझ्या म्हणण्यानुसार आम्ही पाच पोलीस व दोन पंच असे आम्ही सर्व शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथून शासकीय वाहनातून छाप्याच्या ठिकाणी निघालो असे घडले. आम्ही सर्व पोलीस त्या दिवशी गणेवशात होतो किंवा कसे हे आता मला आठवत नाही. शिरोडा पोलीस दूरक्षेत्र ते छाप्याच्या ठिकाणापर्यंत पोहोचण्यासाठी आम्हाला किती वेळ लागला ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर केसमधील पंच उदय परब हे नेहमीचे पंच आहेत. छाप्याच्या ठिकाणापर्यत चारचाकी वाहन जावू शकते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. आम्हाला शासकीय वाहन एका ठिकाणी थांबवावे लागले व छाप्याच्या ठिकाणापर्यत पायी जावे लागले असे घडले किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की छाप्याचे ठिकाण हे दाट लोकवस्तीचे ठिकाण आहे. छाप्याच्या ठिकाणी विरळ लोकवस्ती आहे. ज्या व्यक्तीच्या घरामध्ये छापा टाकायचा आहे त्या व्यक्तीच्या घराच्या पत्त्याची चौकशी करीत आम्ही गेलो होतो. मी फिर्याद देतेवेळी सदर केसमधील दोन्ही पंचांना आजगाव भोमवाडी येथे बोलावून त्यांना गोपनीय बातमीचा आशय समजावून सांगितला, त्यांना पंच म्हणून येण्याची विनंती केली असा मजकूर सांगितला होता. आम्ही ज्या घरात छापा टाकण्यासाठी गेलो त्या घराचा क्रमांक ४४३ होता. आरोपीच्या घराचा क्रमांक ४४३ असल्याचे आम्हाला आरोपीच्या घराच्या दरवाजावर नमूद क्रमांकावरुन समजले. आम्ही आरोपीच्या घराच्या दरवाजावरील क्रमांक पंचांना दाखविला होता. सदर केसमधील दोन्ही पंचांना आम्ही घर क्रमांक ४४३ येथे बोलावून घेतले व गोपनीय बातमीचा आशय समजावून सांगितला असे घडले किंवा कसे हे आता मला आठवत नाही. छाप्याच्यावेळी आम्हाला घर क्रमांक ४४३ चा घरपत्रक उतारा मिळाला किंवा कसे हे आता मला सांगता येणार नाही. छापा टाकल्यावर घर

क्रमांक ४४३ येथे लोकांची गर्दी जमली किंवा कसे हे आता मला आठवत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की छाप्याच्या ठिकाणी विरळ लोकवस्ती असल्याने तेथे कोणीच आले नाही. ज्या व्यक्तीच्या घरामध्ये आम्ही छापा टाकला त्या व्यक्तीने त्याच्या जवळील बंदुक आम्हाला देण्यापुर्वी आम्ही त्यांच्या नावाची चौकशी केली होती. आम्ही त्या व्यक्तीचे आधारकार्ड तपासले होते. माझ्या म्हणण्यानुसार सदर केसमधील सिंगल बॅरल ठासणीची बंदुक आर्टीकल अ जॉन पेद्रु फर्नांडिस यांच्या घरामधून जप्त केली. माझ्या म्हणण्यानुसार सदर आर्टीकल – अ दोन पंचांसमक्ष जप्त केले. माझ्या म्हणण्यानुसार आर्टीकल – अ जप्त केले, त्यावर पंचांच्या सह्याचे लेबले लावून ते लाखी सिल करण्याची प्रक्रिया पंचांच्यासमक्ष पंचनामा करतेवेळी करण्यात आली. मी फिर्याद देतेवेळी आर्टीकल अ जप्त केले, त्यावर पंचांच्या सह्याचे लेबले लावून ते लाखी सिल करण्याची प्रक्रिया पंचांच्यासमक्ष पंचनामा करतेवेळी करण्यात आली असा मजकूर सांगितला होता. (साक्षीदाराला निशाणी २१ येथील फिर्याद दाखविण्यात आली.) सदरचा मजकूर फिर्यादीमध्ये दिसून येत नाही, सदरचा मजकूर माझ्या फिर्यादीमध्ये का नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर केसमधील बंदुक आर्टीकल अ पंचांसमक्ष जप्त करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की बंदुक जप्त करुन त्याचा पंचनामा दोन पंचांसमक्ष केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की बेवारस मुद्देमाल आरोपीच्या नावे दाखवून आरोपीविरुध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

दिनांक– १०/०५/२०२३

(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.